**दिनांक : २१.०३.२०२३**

## विषय : तीन विकसकांची निवड

विषय – पत्रकार नगर संस्थेच्या पुनर्निर्माणासाठी शॉर्टलिस्ट केलेल्या सात विकसकांचे सादरीकरण आणि त्यानंतर तीन विकसकांची निवड.

पंचसमितीच्या दि. पाच मार्च २०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे संस्थेच्या १७ सभासद, तसेच सहसभासदांना, निवडलेल्या सात बिल्डर्सच्या (विकसकांच्या) प्रेझेंटेशनसाठी दि. १४ आणि १५ मार्च रोजी पीवायसी जिमखाना येथे येण्याकरता आमंत्रित करण्यात आले.

या सर्व आमंत्रित सभासदांना, होणाऱ्या सादरीकरणासंबंधी माहिती देण्याकरता त्यांची पंचसमिती सभासदांबरोबर एक बैठक दि. १२ मार्च २०२३ रोजी आयोजित करण्यात आली. सादरीकरणाच्या वेळी सभासदांनी कुठल्या गोष्टींकडे लक्ष द्यायचे, तसेच त्यांनी स्वतंत्रपणे त्यांच्या इच्छेनुसार सातपैकी तीन बिल्डर्सची निवड करावयाची आहे, असे सांगण्यात आले. या बैठकीत आपले एक सभासद श्री. वैशाल नाईक वगळता सगळे १६ आमंत्रित सभासद उपस्थित होते.

आमंत्रित सभासदांच्या मागणीनुसार, त्याच रात्री सर्व सभासदांच्या माहिती व अभ्यासासाठी सात बिल्डर्सना पाठवलेली आपली 'प्रोजेक्ट ब्रीफ विथ स्पेसिफिकेशन्स विशलिस्ट अँड ॲमेनिटिज' डॉक्युमेंट्सची प्रत व्हॉट्सॲपवर पाठविण्यात आली.

ठरल्याप्रमाणे १४ व १५ तारखेला पीवायसी जिमखाना येथे सात बिल्डर्सनी त्यांची सुधारित (रिव्हाइज्ड) ऑफर आणि डिझाइनचे पीपीटी सादरीकरण केले. पहिल्या दिवशी चार आणि दुसऱ्या दिवशी ३ बिल्डर्सचे सादरीकरण झाले. या सादरीकरणाला आपले सल्लागार, विधी सल्लागार, १६ आमंत्रित सभासद आणि पंचसमितीचे दहाही सदस्य उपस्थित होते. सर्व प्रेझेंटेशनचे सूत्रसंचालन सल्लागार श्री. हर्षल कवडीकर यांनी केले.

प्रत्येक बिल्डरला सादरीकरणासाठी एक तास वेळ देण्यात आला होता. त्यात ४५ ते ५० मिनिटे सादरीकरण आणि नंतर १० ते १५ मिनिटे प्रश्नोत्तरांसाठी ठेवण्यात आली होती. प्रत्येक सादरीकरणाच्या सुरुवातीला बिल्डर्सनी दिलेली 'रिव्हाइज्ड कमर्शियल ऑफर'ची बंद (सील्ड) पाकिटे सर्वांसमोर उघडण्यात आली. त्यावर बिल्डर, सल्लागार, तसेच दोन सभासदांची स्वाक्षरीही घेण्यात आली.

सर्व आमंत्रित सभासद, तसेच पंचसमिती सदस्यांना एक ‘कॉम्प्रिहेन्सिव इव्हॅल्युएशन शीट’ देण्यात आली होती. स्वतंत्रपणे भरून ती त्यांना २० मार्चपर्यंत पंचसमिती सचिवांकडे द्यायची होती. त्याप्रमाणे सर्वांनी हे फॉर्म भरून सचिवांकडे वेळेत दिले.

या सर्व इव्हॅल्युएशन शीट्समध्ये दिलेल्या क्रमांकानुसार तीन विकसकांची निवड पंचसमितीने २० तारखेला केली. ही ठरलेली नावे आणि त्यांना प्रत्येक सभासदाकडून मिळालेल्या क्रमांकाचे डिटेल्स सल्लागारांना देण्यात आले आहेत. त्यांनी इतर अँगल्सनी सर्व पडताळणी करून त्यांचे विचारही या निवडीवर घ्यायचे आहेत. त्यानंतर ही तीन नावे अंतिम (फायनल) होतील. यासाठी पंचसमिती सदस्यांबरोबर सल्लागारांची बैठक दि. २४ मार्च २०२३ रोजी संध्याकाळी चार वाजता सल्लागारांच्या कार्यालयात होणार आहे. त्यानंतर तीन बिल्डर्सची नावे त्यांना मिळालेल्या क्रमांकाप्रमाणे ठरविण्यात येतील.

प्रदीप नेवाळकर

पंचसमितीच्या वतीने.